Devrukh Shikshan Prasarak Mandal's

# Athalye-Sapre-Pitre College, Devrukh

-----------------------------------------------------------------

# NSS Report-2019-20

## राष्ट्रीय सेवा योजना

शैक्षणिक वर्ष २०१९-२० राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत वर्षभर उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत वर्षभरात अनेक विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. यामध्ये कारगिल शौर्यगाथा, महिला उद्योजक, एन.एस.एस. स्थापना दिवस, राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व, व्यक्तिमत्त्व विकास, शेतकरी मार्गदर्शन, उद्योजकतेवर मार्गदर्शन या विषयांवर व्याख्याने घेण्यात आली.

तसेच पर्यावरण संरक्षण व संवर्धन, स्वच्छता मोहीम, एड्स जनजागृती, मतदान दिन (जनजागृती) या विषयांवर प्रभातफेरी काढण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत विविध विषयांवर प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये शेतीविषयक प्रशिक्षण, मतदान नोंदणी प्रक्रिया प्रशिक्षण, पथनाट्य लेखन आणि सादरीकरण मार्गदर्शन व प्रशिक्षण व तीन दिवसांचे स्वसंरक्षण प्रशिक्षण या प्रकाराची प्रशिक्षणे घेण्यात आली.

टिकलेश्वर येथे वृक्ष लागवड, बॉटनिकल गार्डनची साफसफाई, रक्तदान शिबीर, मार्लेश्वर यात्रेनंतरची साफसफाई अशी उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली.

यावर्षी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर आंबवली या गावी झाले. आंबवली येथे झालेल्या श्रमसंस्कार शिबिरातील उल्लेखनीय कामगिरी पुढीलप्रमाणे -

आंबवली शाळा नं. १ येथील शाळेतील साफसफाई व खेळाच्या व बागेच्या मैदानाची साफसफाई, नवीन बांधण्यात येणाऱ्या ग्रामदेवता नवलाई देवीच्या मंदिराची साफसफाई, ग्रामपंचायतीत साफसफाई, गावातील पिण्याच्या पाण्याच्या जागेची (तळीची) साफसफाई, गावातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले. तसेच ७ दिवसात २ बंधारे बांधण्यात आले.

दुपारच्या वेळात बौद्धिक सत्रामध्ये व्याख्याने आयोजित केली होती. त्यामधे अन्नातील भेसळ, निसर्ग निर्मितीतून रोजगार संधी, ग्राहक संरक्षण, तरुणाई आणि व्यसनाधिनता, यशस्वी जीवनाचे रहस्य या विषयावर ५ दिवस रोज एक व्याख्यान याप्रमाणे घेण्यात आले.

**प्रा. एस. आर. सोनावणे**
प्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना